सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्षे - ३ रे ❑ अंक - १४४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १ जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## १ ऑगस्टपासून एम्प्लॉयमेंट लिंक्ड इनसेंटिव्ह लागू होणार

### दोन वर्षांत ३.५ कोटी नोकऱ्या देणाऱ्या योजनेला केंद्राची मंजुरी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१नवी दिल्ली**

मोदी सरकारने एम्प्लॉयमेंट लिंक्ड इनसेंटिव्ह (ELI) योजनेला मंजुरी दिली आहे. यानुसार येत्या दोन वर्षांत ३.५ कोटींहून अधिक रोजगार उपलब्ध केले जाणार आहेत. सर्वच क्षेत्रांमध्ये रोजगार निर्मिती करणे, नोकऱ्यांची क्षमता वाढविणे यासह सामाजिक सुरक्षा वाढविण्याची तयारी केली जात आहे.



देशातील बेरोजगारी कमी करणे हे या ईएलआय योजनेचे मुख्य उद्दीष्ट आहे. नवीन नोकरी करणाऱ्यांना म्हणजेच पहिल्यांदा नोकरी करणाऱ्यांना महिन्याचा पगार दोन टप्प्यांत दिला जाणार आहे. यासाठी १५,००० रुपयांपर्यंतचा मासिक पगार गृहीत धरण्यात आला आहे.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याची माहिती दिली आहे. दोन वर्षांत ३.५ कोटींहून अधिक रोजगार निर्मितीला प्रोत्साहन मिळणार असल्याचे ते म्हणाले. यासाठी त्यासाठी १ लाख कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. सर्वांशी चर्चा करून ही योजना तयार करण्यात आली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पात घोषणा केली होती, असे त्यांनी सांगितले.

या योजनेसाठी एकूण दोन लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ४.१ कोटी तरुणांना रोजगार, कौशल्य आणि आर्थिक संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पंतप्रधानांच्या पाच योजनांच्या पॅकेजचा भाग म्हणून २०२४-२५ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात एडख योजनेची घोषणा करण्यात आली होती. १.९२ कोटी लाभार्थी पहिल्यांदाच कामगार क्षेत्रात प्रवेश करतील. या योजनेचे फायदे १ ऑगस्ट २०२५ ते ३१ जुलै २०२७ दरम्यान निर्माण झालेल्या नोकऱ्यांना लागू होतील, असे प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

## केंद्रात सत्ता येताच राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घालणार : प्रियांक खर्गे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१ नवी दिल्ली**

काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी हे आपली लढाई राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणीविरोधात असल्याचे वारंवार सांगत असतात. तसेच संघ देशात फूट पाडत असल्याचा आरोप करत असतात. दरम्यान, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचे पुत्र आणि कर्नाटक सरकारमधील मंत्री प्रियांक खर्गे यांनी जर काँग्रेस पक्ष पुन्हा एकदा केंद्रातील सत्तेल आला तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर देशभरात बंदी घातली जाईल, अशी घोषणा केली आहे.



देशात कोण द्वेष पसरवत आहे, कोण घटना बदलण्याचे इशारे देत आहे, अशा शब्दात प्रियांक खर्गे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर निशाणा साधला. ते पुढे म्हणाले की, संघ आपली राजकीय शाखा असलेल्या भाजपाला देशात बेरोजगारी का वाढत आहे? पहलगाम येथे दहशतवादी हल्ला कसा झाला? हे का विचारत नाही. आता आम्ही केंद्रात सत्तेत आलो की, कायदेशीर प्रक्रियेंतर्गत राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घालू.

प्रियांक खर्गे पुढे म्हणाले की, ईडी, प्राप्तिकर विभाग आणि इतर सर्व तपास यंत्रा ह्या केवळ विरोधी पक्षांवरच कारवाया करण्यासाठी आहेत का? सरकार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची चौकशी का करत नाही. त्यांच्याकडे पैसा कुठून येतोय. त्यांच्या उत्पन्नाचा स्रोत काय? याची चौकशी का केली जात नाही. संघाचे लोक नेहमीच द्वेषपूर्ण भाषणं आणि घटनाबदलण्याचे दावे केल्यानंतरही कसे काय सुटतात, आर्थिक गुन्ह्यांमधून कसे वाचतात, याचीची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणीही प्रियांक खर्गे यांनी केली.

## मोदी तुमचा बाप असेल, शेतकऱ्यांचा नाही , विधानसभेत गदारोळ; नाना पटोलेंचं निलंबन!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१ मुंबई**

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे व भाजपा आमदार बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांबाबत केलेल्या विधानावरून आज विरोधकांनी विधानसभेत गोंधळ घातला. पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी काँग्रेस आमदार नाना पटोले व विरोधी बाकांवर बसलेल्या अनेक आमदारांनी घोषणाबाजी केली. खुद्द नाना पटोले अध्यक्षांच्या खुर्चीजवळ जाऊन राहुल नार्वेकर यांना जाब विचारू लागले. यावर मुख्यमंत्र्यांनी नाना पटोलेंच्या माफीची मागणी केली. यानंतर कामकाज चालू ठेवण्यासाठी म्हणून नाना पटोलेंचं दिवसभरासाठी निलंबन करत असल्याचं विधानसभा अध्यक्षांनी जाहीर केलं.

**मोदी तुमचा बाप असेल**

राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे व भाजपा आमदार बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांबाबत केलेली काही विधानं गेल्या काही दिवसांमध्ये वादग्रस्त ठरली होती. या विधानाचा संदर्भ देत नाना पटोलेंनी विधानसभेत संताप व्यक्त केला. तसेच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी याबद्दल सभागृहात माफी मागितली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. मात्र, त्यावेळी गोंधळ सुरू झाला.बबनराव लोणीकर व कृषीमंत्री माणिकराव कोकाटे शेतकऱ्यांचा सातत्याने अपमान करत आहेत. हा




अपमान अन्नदाता सहन करणार नाही. मुख्यमंत्र्यांनी सभागृहात शेतकऱ्यांची माफी मागितली पाहिजे. मोदी तुमचा बाप असेल, शेतकऱ्यांचा बाप होऊ शकत नाही, असं नाना पटोले म्हणाले.

दरम्यान, यावर असंसदीय शब्दांचा उल्लेख केल्याबद्दल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी नाना पटोलेंना समज दिली. पण तेव्हाच नाना पटोले अध्यक्षांच्या खुर्चीजवळ जाऊन तावातावाने बोलू लागले. यानंतर ५ मिनिटांसाठी सभागृह स्थगित करण्यात आलं. त्यानंतर कामकाज सुरू झाल्यावर विरोधकांनी माफी मागा, माफी मागा, शेतकऱ्यांची माफी मागा, अशा घोषणा द्यायला सुरुवात केली.

**मुख्यमंत्र्यांनी केली माफीची मागणी**

दरम्यान, राहुल नार्वेकरांनी वारंवार समज दिल्यानंतरदेखील नाना पटोले अध्यक्षांच्या खुर्चीजवळ जाऊन वाद घालत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाना पटोलेंच्या माफीची मागणी केली. एखाद्या विषयावर भावना व्यक्त करणं वेगळी गोष्ट आहे. पण थेट अध्यक्षांवर धावून जाणं अशोभनीय आहे. जणूकाही अध्यक्षच दोषी आहेत अशा पद्धतीने अध्यक्षांवर धावून जाणं हे या सभागृहात आम्ही पहिल्यांदाच पाहतोय. लोकं वर गेले, नाही असं नाही. पण अध्यक्षांच्या अंगावर धावून जाणं हे योग्य नाही. नाना पटोले स्वत: अध्यक्ष राहिले आहेत. त्यांनी असं वागणं योग्य नाही. नाना पटोलेंनी माफी मागायला हवी, असं मुख्यमंत्री म्हणाले.

## कुणीही स्वतःच्या खिशातून पैसे देत नाही

### मुख्यमंत्री फडणवीसांचं महाराष्ट्रातील जनतेला आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१मुंबई**

राज्यात उघडकीस आलेल्या टोरेस घोटाळ्यासंदर्भात विधानसभेत प्रश्न विचारण्यात आला. अशा प्रकारच्या आर्थिक फसवणुकीच्या घटनांबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली. याबद्दल बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रातील जनतेला आवाहन केले. पोलिसांकडून केल्या जात असलेल्या उपाययोजनांबद्दलही मुख्यमंत्री फडणवीस यांनी माहिती दिली.

विधानसभेत बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, अशा प्रकारची आमिषे दाखवणाऱ्या कंपन्या, आकर्षक परतावा देण्याच्या योजना चालवणाऱ्या कंपन्या याच्यामध्ये गुंतवणूक करू नका अशी मोहीम पोलिसांनी हाती घेतली आहे. जाहिराती पण दिल्या आहेत. त्यासंदर्भात जनजागृतीची मोहिमही हाती घेण्यात आली आहे. अर्थात अशी कंपनी सुरू झाल्याबरोबर पोलिसांना कारवाई करण्याचा मार्ग नाहीये. कारण अशी कंपनी सुरू करण्यासाठी कंपनी अधिनियमाच्या अंतर्गत नोंदणी करावी लागते. पोलिसांची परवानगी घ्यावी लागत नाही.



आपण आर्थिक गुप्तचर शाखाही सुरू केली आहे. कंपन्यांनी अधिकचा नफा देणाऱ्या जाहिराती दिल्या. तर त्या आधारावर कारवाई आपण करतो आहे. पण, यामध्ये व्यापक जनजागृती हाच एक महत्त्वाचा विषय आहे. कारण अनेकवेळा अशा घटना घडलेल्या आहेत की, या कंपन्या नोंदणीकृतही नसतात. कुणाची परवानगी नसते. थेट बोर्ड लावतात. लोकांकडून पैसे घेतात. पहिले दोन-तीन महिने व्याज सांगितलेलं असतं, तसं परत करतात. नंतर सगळा गाशा गुंडाळून गायब होतात, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मी या सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेला विनंती करतो की, कुणीही तुम्हाला अधिकचं व्याजदर देण्याची हमी देत असेल किंवा तशी योजना आणत असेल, तर विश्वास ठेवू नका. त्यांच्याकडे सगळ्या परवानग्या आहे की, नाही बघा. ते कशाच्या आधारावर देणार आहेत? कुणीही स्वतःच्या खिशातून पैसे देत नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या फसवणुकीच्या संदर्भात लोकांनी जागरूक राहिले पाहिजे. पोलिसही जास्तीत जास्त जाणीव जागृतीचा कार्यक्रम हाती घेतील, अशी माहिती फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

## महाराष्ट्रात आजपासून वाहनांवरील नवीन करप्रणाली लागू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१मुंबई**


महाराष्ट्रातवाहनांवरीलकरावर आजपासून मोठा बदल करण्यात आला आहे. यानुसार १ जुलै २०२५ पासून नवीन वाहन कर प्रणाली लागू करण्यात आली आहे. यामुळे महागड्या वाहनांसोबतच सीएनजी, एलएनजीसह मालवाहू वाहनांच्या किंमती वाढणार आहेत.




या नव्या कर सुधारणेमध्ये सर्व खासगी सीएनजी/एलपीजी वाहनांसाठी वन टाईम करात १% वाढ करण्यात येणार आहे. तसेच मोटार वाहन (एमव्ही) कराची कमाल मर्यादा २० लाख रुपयांवरून ३० लाख रुपये करण्यात आली आहे. म्हणजेच आता २० लाख रुपयांवरील वाहनांना जास्त कर द्यावा लागणार आहे. यामुळे वाहनांची ऑनरोड किंमत वाढली आहे. यामुळे महाराष्ट्र सरकारला २०२५-२६ साठी सुमारे १७० कोटी रुपये अतिरिक्त महसूल मिळणार आहे.

समजा एखाद्याने महाराष्ट्रात १० लाख रुपयांची सीएनजी कार घेतली तर त्याला आधी ७० हजार रुपये करापोटी द्यावे लागत होते. ते आता ८०००० रुपए द्यावे लागणार आहेत. तसेच जर २० लाखांची सीएनजी कार घेतली तर १.४ लाख रुपयांऐवजी १.६ लाख रुपये कर द्यावा लागणार आहे. महाराष्ट्रात सीएनजी वाहनांना मोठी मागणी आहे.

तसेच पेट्रोल, डिझेल कारसाठी किंमतीनुसार कर भरावा लागणार आहे. १० लाख रुपयांपेक्षा कमी किमतीच्या पेट्रोल कारवर ११% कर आकारला जाईल. १० ते २० लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या कारवर १२% कर आणि २० लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या कारवर १३% कर भरावा लागेल. तर, डिझेल कारवर अनुक्रमे १३%, १४% आणि १५% कर आकारला जाईल. तसेच मालवाहू वाहनांसाठी यापूर्वी त्यांच्या वजनावर कर आकारला जात होता, ते आता बदलून किंमतीच्या ७ टक्के एवढा आकारला जाणार आहे.



## संपादकीय ......

# हिंदी भाषेला स्थगिती

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या हिंदी भाषा समावेशाच्या वादावर आता जवळपास पडदा पडला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्यात त्रिभाषा सूत्र लागू करण्याबद्दलचे दोन शासकीय आदेश रद्द करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली असून, त्रिभाषेच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी अर्थतज्ज्ञ आणि माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली जाईल. ही स्थगिती, तसेच स्थापन केलेली नवीन समिती याचाच अर्थ नवीन शैक्षणिक वर्षात त्रिभाषा धोरण नसेल. त्यामुळे पहिलीच्या विद्यार्थ्यांवर तीन-तीन भाषा शिकण्याचे ओझे नसेल. विद्यार्थी व पालकांच्या दृष्टीने ही आनंदाचीच बातमी; पण 'स्थगिती'ऐवजी पहिलीपासून हिंदीची अनिवार्यता कायमची जावी, अशी मागणी आहे. हा निर्णय रद्द झाला आहे, असे आम्ही गृहीत धरतो. त्यामुळे आता समितीचा घोळ घालू नये; अन्यथा समितीला काम करू दिले जाणार नाही, असे मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी सुनावले आहे.

मनसेने एप्रिलमध्येच या धोरणाविरोधात चढा सूर लावला आणि त्यानंतर उद्धव ठाकरे यांची शिवसेना, काँग्रेस, शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही विरोध केला. आता सरकारच्या निर्णयामुळे ठाकरे बंधूंनी नियोजित मोर्चा मागे घेतला. त्रिभाषा सूत्रानुसार वास्तविक ही सक्ती नसून, अन्य भाषांचा पर्यायही उपलब्ध आहे. गरज पडल्यास, तिसरी भाषा म्हणून विविध भाषांच्या शिक्षणाची सोय होऊ शकेल, ही सरकारची भूमिका होती; पण उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हिंदी पहिलीपासून नव्हे, तर पाचवीपासून शिकवावी, असे मत जाहीरपणे मांडले होते. तसेच, हिंदीचा मुद्दा रेटला तर त्याचा येत्या स्थानिक स्वराज्य निवडणुका आणि खासकरून मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत महायुतीला तडाखा बसेल, अशी भीती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, तसेच अन्य काही मंत्र्यांनीही व्यक्त केली होती. त्यामुळेच अखेर त्रिभाषा सूत्र लागू करण्याबाबत १६ एप्रिल आणि १७ जून रोजी काढलेले दोन्हीही शासकीय आदेश रद्द करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला.

नवीन शिक्षण धोरणात पहिली व दुसरी हा बालशिक्षणाचा भाग करण्यात आला आहे. बालशिक्षण हे अनौपचारिक शिक्षणाचे अंगण असून, ते पुढील शिक्षणासाठी आणि आयुष्य जगण्यासाठी लागणार्या क्षमतांच्या विकासाचे क्षेत्र आहे. या उमलत्या वयात मुलांच्या मनावर कुठल्याही प्रकारचा ताण असू नये, तर ते आनंदाने, हसतखेळत शिकण्याचे क्षेत्र आहे, असे मानले जाते. म्हणजेच त्या वयात मुलांमध्ये शिकण्याची आणि अभ्यासाची आवड निर्माण केली जाते. या वयात मुलांना सक्तीने किंवा हट्टाने एखादी भाषा शिकवणे हे योग्य नाही. त्यामुळे मुलांमध्ये शिक्षणाची नावड निर्माण होऊ शकते. मुळात पहिलीतील मुले अगदी लहान असतात. एका ठिकाणी चार-पाच तास बसणे त्यांच्या दृष्टीने कठीण असते. त्यांना एकदम बरेच विषय शिकावे लागतात आणि त्यातच तीन-तीन भाषा शिकाव्या लागणे, हे अशैक्षणिक आणि अन्यायकारक आहे.

खरे तर, इयत्ता चौथीपर्यंत सर्व विषय हे मातृभाषेतच शिकवायला पाहिजेत. कारण, पहिल्या चार वर्षांत शाळेची सवय होते, शारीरिक क्षमता वाढते, आकलनाचा पाया मजबूत होतो आणि मातृभाषेत शिकल्यामुळे विषय नीट समजतो. मध्येच दुसरी भाषा आली, तरी मुला-मुलींच्या ग्रहणक्षमतेवर विपरीत परिणाम होतो. लहान मुलांना एकाच भाषेत आणि तेही मातृभाषेतच शिकवले पाहिजे, असे आचार्य विनोबा भावे, तसेच आचार्य जावडेकर यांचेही मत होते. मराठी साहित्य संमेलनाध्यक्ष तारा भवाळकर यांच्या मते, मूल पहिल्यांदा इतरांना बोलताना पाहत असते. आई गाणी म्हणते, आजी काही तरी बोलत असते, याचे निरीक्षण लहान मूल करत असते. त्याला लीपरीडिंग, म्हणजे ओष्ठवाचन म्हणतात. यानंतर उच्चार करण्याचा आणि त्याच पद्धतीने बोलण्याचा प्रयत्न ते करते; मग ते वाचू लागते. यानंतर समोर दिसणारे अक्षर आणि कानवळणी पडलेल्या उच्चारांची सांगड घालण्याचा प्रयत्न करते; मग पुढे शेवटच्या टप्प्यात लिहायला लागते.

हिंदी व इंग्रजी भाषा पहिलीपासून सक्तीची करण्याची शिफारस समितीने केली होती आणि ठाकरे यांनी तो अहवाल मंत्रिमंडळाच्या बैठकीत स्वीकारला होता, याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनीच दिली आहे. म्हणजे जो अहवाल स्वीकारला, त्यावरच सरकारबाहेर पडल्यानंतर ठाकरे प्रभृतींनी टीका करण्यास आरंभ केला आहे. त्यावरून सुरू असलेले राजकारण त्याहून चिंता वाढवणारे आहे. मात्र, मुळात त्रिभाषा सूत्र स्वीकारण्यापूर्वी ते कशासाठी आहे, याचे प्रबोधन गरजेचे होते. या शिक्षणव्यवस्थेच्या केंद्रस्थानी असलेल्या विद्यार्थ्याला काय हवे याचा साकल्याने विचार कधी होणार? तो केला गेला असता, तर विद्यार्थी व पालकांच्या मनातही इतका गोंधळ निर्माण झाला नसता. शालेय शिक्षणासंबंधीचे निर्णय अधिक विचारपूर्वक आणि सर्व अंगाने विचार करून घेतले जाणे अपेक्षित असते, हे येथे लक्षात घेतले पाहिजे.






## रिमझिम पावसात गरमागरम भुट्टा खाण्याचा कॉलेजकाळातला रोमान्स! कणीस खाण्याचेही ५ फायदे

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक**

मक्याचे कणीस खाण्याचे आरोग्यदायी फायदे

मक्याचे कणीस तुम्ही भाजलेले खा किंवा मग उकडलेले खा, ते छानच लागते. हे कणीस फक्त रसनातृप्ती करतं असं नाही, तर ते आरोग्यासाठीही अतिशय गुणकारी ठरतं. ते खाल्ल्यामुळे शरीराला नेमके काय फायदे होतात ते पाहूया..

१. मक्याच्या कणसामधून भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन ए आणि व्हिटॅमिन सी मिळतं. व्हिटॅमिन ए डोळ्यांसाठी चांगलं असतं तर व्हिटॅमिन सी रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी उपयुक्त ठरतं. व्हिटॅमिन सी त्वचेसाठीही अतिशय उत्तम असतं.

२. व्हिटॅमिन ए प्रमाणेच बीटा कॅरोटीनही मक्याच्या कणसामध्ये चांगल्या प्रमाणात असतं. डोळ्यांच्या आरोग्यासाठी ते खूप गरजेचं असतं. त्यामुळेच मक्याचं कणीस या दिवसात मुलांनाही खायला द्यावं.

३. मक्याचं कणिस जर उकडून खाल्लं तर पोटासाठी खूप दमदार होतं. ते खाल्ल्यानंतर बराच वेळ भूक लागत नाही. त्यामुळे वजन कमी करणाऱ्यांसाठीही ते फायदेशीर ठरतं.

४. फायबर आणि व्हिटॅमिन्स भरपूर असल्याने मक्याचे कणीस रक्तदाब नियंत्रित ठेवण्यासही उपयुक्त ठरते.

## आषाढी एकादशीला प्रवासी सेवेसाठी येणाऱ्या सर्व एसटी कर्मचाऱ्यांना भोजन मोफत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१पंढरपूर**

भूवैकुंठ असलेल्या पंढरपुरात आषाढी एकादशीच्या दिवशी लाखो वारकरी येतात. वारकऱ्यांना पंढरपूरपर्यंत पोहोचण्यासाठी एसटी महामंडळानेकडून अधिक बस चालवल्या जाणार आहेत. त्याचबरोबर आषाढी एकादशी निमित्ताने राज्याच्या वेगवेगळ्या भागातून पंढरपूरला बसेस घेऊन येणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी मोफत भोजनाची व्यवस्था असणार आहे. राज्याचे परिवहन आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी याबद्दलची माहिती दिली.

आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सेवेसाठी एसटीच्या ५,२०० बसेसची व्यवस्था केली आहे. या बसेस घेऊन येणारे चालक, वाहक त्यांची देखभाल करणारे यांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक, अधिकारी यांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था मोफत करण्यात आली आहे, असे प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

## युवा स्वाभिमान पार्टीच्या वतीने आ.रवि राणा यांच्या हस्ते गोर-गरिब कुटुंबातील होतकरु गरजु विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व पुस्तकांचे वाटप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**



स्वत: गरीब कुटुंबातानु आलेले शुन्यातुन विश्व निर्माण करणारे व गोर गरिब जनतेची जान असणारे बडनेरा मतदार संघाचे आमदार जनतेचे कैवारी रवि राणा हे नेहमीच तरुणांना रोजगार निर्माण करण्याकरिता, निराधार महिलांना सक्षम करण्याकरिता तसेच शिक्षणामध्ये आवड असणाऱ्या परंतु आर्थिक परिस्थीती अभावी शिक्षण पुर्ण न करु शकाणाऱ्या गोर-गरिब कुटुंबातील होतकरु गरजु विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करत असतात त्या अनुषंगाने नुकतीच बडनेरा मतदार संघातील अतिशय गोर-गरिब कुटुंबातील आठव्या व नवव्या वर्गात शिकणाऱ्या गरजु विद्यार्थ्यांना शालेय साहित्य तसेच पुस्तकांचे वाटप करुन शैक्षणिक मदत केली. तसेच भविष्यामध्ये शिक्षणाकरिता आणखी काही मदत लागल्यास मी सदैव तयार असल्याचे यावेळी आ.रवि राणा यांनी सांगितले. तसेच गरजु विद्यार्थ्यांना वेळोवेळी शैक्षणिक मदत सुद्धा करणार असल्याचे सांगितले. यावेळी गणेशदास गायकवाड, राजा बागडे, दुर्योधन जावरकर, अविनाश काळे, पंकज शर्मा, अनिकेत शेलोकार, साक्षी उमक, बादलभाऊ, शुभम उंबरकर आदि उपस्थित होते.

## मका पेरलाय, लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी ही फवारणी कराच, वाचा सविस्तर




विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक**

नाशिक जिल्ह्यात खरीप हंगामातील मका हे महत्वाचे तृणधान्य पिक आहे. सद्यस्थितीत मका पिकाची पेरणी १९ हजार ६ हजार हेक्टर क्षेत्रावर झालेली असून मका पिकाच्या सरासरी क्षेत्राच्या ८३ टक्के क्षेत्रावर पेरणी झालेली आहे.

पेरणी झालेल्या मका पिकावर काही ठिकाणी नवीन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. सदर किडीच्या नियंत्रणासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना कराव्यात.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

**लक्षणे :**

नवीन लष्करी अळीचा प्रादुर्भाव मका पीक १५ दिवसापासून ते कणी अरेपर्यंत दिसून येते. प्रथम अवस्थेतील अळी ही कोवळ्या पानांवर आपली उपजीविका करते. एका बाजूने खरवंडून खाल्ल्यामुळे पानावर पांढरे ठिपके दिसून येतात. पूर्ण वाढ झालेल्या अळ्या झाडाची पूर्ण पाने खाऊन फरू पानाच्या मिराना शिल्लक ठेवतात. पाने अर्ध्यातून खाऊन कापून टाकते. अळीच्या प्रादुर्भावाने पिकाच्या गाभामध्ये ओला, पिवळा, तपकारी रसाचे खाउन शिलक राहिलेल चुरा भरून ठेवते.

**प्रतिबंधात्मक उपाय :**

नवीन लष्करी अळी समूहाने अंडी घातल्याने अंडपुंज व समूहातील बारीक अळ्या हाताने वेचून नष्ट करावी, नवीन लष्करी अळीचे पतंगाच्या देखरेखीसाठी प्रती हेक्टरी ५ कामगंध सापळयाचा वापर करावे. तसेच पतंगाच्या एकात्मिक प्रतीबंधासाठी २० सापळे स्थापित करावी. नवीन लष्करी अळीचे पतंग नियंत्रणासाठी प्रती हेक्टरी १ प्रकाश सापळ्याचा वापर रात्री ६ ते १० च्या दरम्यान चालू ठेवावे. किडीची अळी अवस्था नियंत्रणासाठी प्रती एकरी २० पक्षी धाबे उभे करा

**जैविक नियंत्रणाचे उपाय**

पेरणीच्या वेळेस निबोळी पेंड प्रती हेक्टरी २५० किलो किडीची कोश अवस्था नियंत्रणासाठी वापरावे. ट्रायकोग्रामा चीलोणीस या परजीवी किडीची अडी ३० हजार / प्रती एकर पीक १५ दिवसाचे झाल्यावर आठवड्यातून एकदा सोडावे. नवीन लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी बेरीया बसिना १.१५ डब्लुपी प्रती ५० मिली/१५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. नवीन लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी पिकाच्या सुरुवातीच्या काळात ५६ निंबोळी अर्काची फवारणी करावी. नवीन लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी दर्शपर्णी अर्क प्रती १५० मिली/१५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**रासायनिक नियंत्रणाचे उपाय :**

जर नवीन लष्करी अळीची संख्या आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडली (१०% प्रादुर्भाव ग्रस्त झाडे/५ ते १० पतंग / प्रती सापळा/ सलग ३ रात्र) तर खालील किटकनाशकाची फवारणी करावी.

## आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांची चरण सेवा व आरोग्यसेवा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१अमरावती**

पंढरपूर वारीसाठी निघालेल्या वारकऱ्यांची चरण सेवा आणि आरोग्यसेवा श्री संत शिरोमणी नरहरी महाराज प्रार्थना मंदिर दस्तूर नगर अमरावती येथे मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती आणि श्री सत्यसाई सेवा संघटना, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने भक्तिभावाने पार पडली. या उपक्रमात आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार व आवश्यक औषधांची सेवा पूर्णतः श्री सत्यसाई सेवा संघटना यांच्यामार्फत प्रदान करण्यात आली. सेवा दलातील स्वयंसेवकांनी समर्पणभावाने वारकऱ्यांची सेवा केली.तसेच, या प्रसंगी उपस्थित सर्व वारकऱ्यांना मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या कार्यपद्धती, उपचारासाठी मिळणारी आर्थिक मदत व अर्ज प्रक्रियेबाबत माहिती देण्यात आली.वारकऱ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेत सेवाभावी उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले.

## कृषी शास्त्रज्ञांची शेत शिवारात भेट व मार्गदर्शन : पी.आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयाचा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य तथा सेवानिवृत्त कीटक शास्त्रज्ञ डॉ. अनिल ठाकरे यांनी वरुड तालुक्यातील शेंदुरजनाघाट व टेंभुर्खेडा येथील शेत शिवारातील संत्रा क्षेत्राला भेट देऊन संत्रा पिकावरील कीड, रोग, खत, तसेच तण व्यवस्थापन संदर्भात शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.नियमित बदलत असलेल्या हवामानामुळे संत्रा पिकामध्ये निर्माण होत असलेले विविध जैविक व अजैविक ताण यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची चिंता वाढली असून पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती येथील शास्त्रज्ञांकडून शेत शिवारांना भेटी देत शेतकऱ्यांच्या समस्यांचे निवारण केले जात आहे.




प्रक्षेत्र भेटी नंतर शेंदुरजना घाट येथील केदारेश्वर सभागृह तसेच टेंभुर्खेडा येथील ग्रामपंचायत कार्यालयामध्ये संत्रा पिक व्यवस्थापन संदर्भात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले.सदर कार्यक्रम संत्रा इस्टेट, उमरखेड ता. मोर्शी चे प्रभारी अधिकारी श्री. शुद्धोधन वरघट यांनी केले होते.सदर शेतकरी मार्गदर्शन व प्रक्षेत्र भेटी प्रसंगी श्री राहुल सातपुते, जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी यांनी उपस्थित राहून सिट्रस इस्टेट या योजनेबद्दल उपस्थित शेतकरी बांधवांना सखोल मार्गदर्शन केले.याप्रसंगी मोर्शी येथील उपविभागीय कृषी अधिकारी श्री. उज्वल आगरकर यांच्यासह मोर्शी व वरुड येथील कृषी विभागातील कर्मचारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.श्री. भाकरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर उपस्थित शेतकऱ्यांनी सदर कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल आभार मानले.

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. १ जुलै २०२५

शहर/ग्रामिण

# मॉडेल सोलर व्हिलेज योजनेचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते शुभारंभ

## 'सौर ऊर्जा' विकास निधी; गावांना विकासाची संधी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१अमरावती –** केंद्र शासनामार्फत पी. एम. सूर्यघर मुफ्त बिजली योजनेअंतर्गत 'मॉडेल सोलर व्हिलेज योजना' येत्या सहा महिन्यांसाठी राबविण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत निवड झालेल्या गावांनी सर्व अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पांची क्षमता दहा मेगा वॅट पर्यंत नेणे अपेक्षित आहे .विजेत्या गावांना एक कोटी रुपयांचे केंद्रीय वित्तीय सहाय्य मिळेल. यासाठी स्पर्धेत विजयी होण्यासाठी प्रत्येक गावाने चांगले काम करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज येथे केले.

पी. एम. सूर्यघर मुफ्त बिजली योजनेअंतर्गत मॉडेल सोलर व्हिलेज योजनेचा आज जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांच्या हस्ते नियोजन भवन येथे शुभारंभ झाला, त्यावेळी ते बोलत होते. महाऊर्जाचे विभागीय महाव्यवस्थापक प्रफुल्ल तायडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रीती देशमुख तसेच प्रकल्प अधिकारी , सरपंच, उपसरपंच यावेळी उपस्थित होते .

जिल्हाधिकारी श्री. येरेकर म्हणाले, पारंपारिक ऊर्जा स्त्रोतावरचे अवलंबित्व कमी करून अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतावर भर देण्याचा निर्धार शासनाने केला आहे. या दृष्टीने स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या गावांमध्ये स्पर्धेच्या कालावधी दरम्यान जास्तीत – जास्त विविध अपारंपारिक ऊर्जा साधने, सौर उपकरणे आस्थापित करणे गरजेचे आहे. यासाठी सरपंच, उपसरपंच तसेच गावकऱ्यांनीही पुढाकार घ्यावा. सर्व उपकरणांमध्ये पीएम सूर्यघर योजनेअंतर्गत जास्तीत –जास्त घरांवर सोलर रूफ टॉप प्रकल्पाची उभारणी करावी. तसेच पीएम कुसुम योजनेअंतर्गत जास्तीत – जास्त सौर पंप अथवा इतर विकेंद्रित अपारंपारिक ऊर्जा



प्रकल्प आस्थापित करणे आवश्यक आहे. या सर्व अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पांची क्षमता दहा मेगावॅट पर्यंत असणे आवश्यक आहे .यासाठी सीएसआर निधी, विभागाचा निधी किंवा जिल्हास्तरीय निधी व अन्य उपलब्ध असलेल्या निधीचा वापर करता येईल. तसेच जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांच्याशी चर्चा करून त्यांचेही सहकार्य घ्यावे. हा शासकीय उपक्रम पूर्ण होण्यासाठी लोकसहभाग अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. याबाबत गावकऱ्यांमध्ये जनजागृती निर्माण करून सहा महिने विशेष प्रयत्न करून स्पर्धक गावांनी आपले उद्दिष्ट पूर्ण करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सौर कृषी पंप योजना अत्यंत महत्त्वाची आहे. दिवसा वीज पुरवठा खंडित होत असल्यामुळे शेतकऱ्यांना रात्री शेतात पाणी द्यावे लागते. परंतु सौर कृषी पंप योजना यासाठी शेतकऱ्यांना मदतनीस ठरत आहे .याच प्रमाणे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना देखील शेतकऱ्यांना लाभदायी ठरत आहे. याबाबत जनजागृती निर्माण करावी. स्पर्धेतून मिळालेल्या निधीमध्ये गावाचा विकास होण्यास निश्चितच मदत होणार असल्याचा विश्वास जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी व्यक्त केला.

जिल्ह्यातील गावांच्या विकासाला चालना देण्यासाठी केंद्र शासनाची पी. एम. सूर्यघर मुफ्त बिजली योजनेअंतर्गत मॉडेल सोलर व्हिलेज योजनेंतर्गत अमरावती तालुक्यातील वलगाव, भातकुली तालुक्यातील पुर्णा नगर, धामणगाव रेल्वे तालुक्यातील मंगरुळ दस्तगीर, तिवसा तालुक्यातील वऱ्हा, मोर्शी तालुक्यातील हिवरखेड, चांदुर बाजार तालुक्यातील घाटलाडगी, अचलपूर तालुक्यातील धामणगाव गढी, अंजनगाव सुर्जी तालुक्यातील कापुस तळणी, दर्यापुर तालुक्यातील वडनेर गंगाई तसेच वरुड तालुक्यातील जरुड या स्पर्धक गावांची निवड झाली आहे,अशी माहिती विभागीय महाव्यवस्थापक प्रफुल्ल तायडे यांनी दिली आहे.

# धामणगाव तालुक्यात दोन सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित

## शेतकऱ्यांना मिळणार अखंडित वीजपुरवठा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१धा.रेल्वे–** मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या माध्यमातून शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित व योग्य दाबाचा वीजपुरवठा करण्यासाठी महावितरणकडून सौरऊर्जा प्रकल्पाची कामे पूर्णत्वाकडे जात आहेत. डिसेंबर २०२४ ते आजपर्यंत तालुक्यात



दहा मेगावॅट क्षमतेचे दोन प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. या प्रकल्पांद्वारे अडीच हजार शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा केला जात आहे.

महाराष्ट्रात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेद्वारे राज्यात प्रकल्प मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करून राज्यात शेतीसाठी पूर्णपणे सौरऊर्जेवर निर्माण झालेल्या विजेचा पुरवठा करण्यात येणार आहे. या योजनेत वीज उपकेंद्राच्या ५ किमी परिघातील जमिनीवर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत आहेत. यातून निर्माण होणारी वीज महावितरणच्या उपकेंद्रांतील फिडरद्वारे परिसरातील कृषिपंपांना दिवसा पुरवण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत जलदगतीने सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत आहेत. सौर ऊर्जा प्रकल्पामुळे दिवसा वीज मिळणार असली तरी पाण्याचा उपसा मर्यादित ठेवण्याची गरज आहे.

धामणगाव तालुक्यात दाभाडा, नारगावंडी, जुना धामणगाव येथे ३३/११ केव्ही उपकेंद्राअंतर्गत ३० मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार आहेत.



धामणगाव मतदारसंघातील प्रत्येक शेतकऱ्याला दिवसा वीज मिळावी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याच्या कामाला गती आली आहे. सध्या दोन प्रकल्पांमधून अडीच हजार शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळत आहे.

– **प्रताप अडसड,** आमदार, धामणगाव रेल्वे.

### मंगरूळ, देवगाव परिसरातील शेतकऱ्यांना मिळतेय वीज

जळगाव येथून मंगरूळ दस्तगीर उपकेंद्र, तर उसळगव्हाणमधून देवगाव अशा दोन उपकेंद्रांतून निघणाऱ्या कृषी वीज वाहिन्यांवरील अडीच हजार शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा होत आहे. दिवसा वीजपुरवठा होत असल्यामुळे शाश्वत शेती करण्याचे शेतकऱ्यांचे स्वप्न मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मुळे पूर्णत्वास आले आहे. महावितरणच्या उपकेंद्रांतील फिडरद्वारे परिसरातील कृषिपंपांना दिवसा पुरवण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत जलदगतीने सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत आहेत.

### मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० : शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा

## महानगरपालिका आयुक्त

# सौम्या शर्मा चांडक यांनी केली अग्निशमन विभागाची पाहणी




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१ अमरावती–** महानगर पालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी अग्निशमन विभागाची पाहणी केली. या पाहणी दरम्यान उपायुक्त डॉ.मेघना वासनकर, सहाय्यक आयुक्त तथा जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर, प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी लक्ष्मण पावडे, प्रभारी अग्निशमन अधिक्षक संतोष केंद्रे, अग्निशमन दल, मनपा कर्मचारी उपस्थित होते. यावेळी महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी अग्निशमन विभागाची पाहणी करतांना निर्देश दिले की, सीसीटीव्ही लावण्यात यावे. अग्निशमन विभाग हे अद्यावत असणे आवश्यक असून संपुर्ण विभाग संगणीकरण करण्याचे काम करावे. अग्निशमन विभागाने सर्व अत्यावश्यक सेवेसह सज्ज असणे गरजेचे आहे. अग्निशमन विभागाने आलेल्या सर्व कॉलचा डाटा तयार करावा. अग्निशमन विभागाचे फलक तयार करुन विभागाचा मुख्य ठिकाणी लावावे. अग्निशमन विभागाने समन्वयाने काम करुन आपली जबाबदारी पुर्ण करावी.

सदर विभागाचे व परिसराचे नियोजन व्यवस्थित करावे. सदर अग्निशमन केंद्रासाठी आवश्यक अग्निशमन कर्मचारी, अग्निशमन वाहने, उपकरणे, चालक उपलब्ध आहेत. या ठिकाणी सुसज्ज व्यवस्था करण्याचे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले. या केंद्रामुळे या परिसरातील विविध भागात आपत्कालीन स्थितीत तातडीने पोहोचता येणार असल्याचे त्यांनी सांगितले. शहराचा विस्तार वाढत असतांना ज्याप्रमाणे पायाभूत सुविधा वाढत आहे. त्याचप्रमाणे अग्निशमन केंद्रांची देखील निकड भासत आहे.

अग्नी सुरक्षा हा एक महत्वाचा विषय असून यामध्ये अग्निशमन दलाचे अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासोबतच नागरिकांचाही सहभाग महत्वाचा आहे, कारण आगीच्या घटनेत सर्वात पहिला प्रतिसाद कोणी देत असतात, तर ते नागरिक असतात. त्यामुळे या विषयाबाबत नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करणे महत्वाचे आहे. त्याचबरोबर शालेय मुलांमध्ये देखील या विषयाबाबत प्रबोधन करण्यात यावी व सर्व वाणिज्य आस्थापनांनी अग्निशमन यंत्रणा सुरक्षेच्या दृष्टीने त्यांच्या आस्थापनांमध्ये लावने बंधनकारक आहे व ते लावली की नाही तपासून घ्यावी तसेच महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियमाचे काटेकोरपणे अमलबजावणी झाली पाहिजे असे निर्देश महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी दिले.

# शाळेचे छत गळके,वर्गखोल्यांमध्ये खड्डे,मैदानात दगड

## नांदगावपेठ शाळेचा गलथान कारभार!, विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१नांदगावपेठ**

शैक्षणिक गुणवत्ता, स्वच्छता आणि विद्यार्थ्यांचे हित या सर्व बाबींना ठेंगा दाखवणाऱ्या जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय नांदगावपेठ येथील शाळेच्या दुरावस्थेमुळे विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वर्गखोल्यांना गळती लागलेली असून, जमिनीवर खड्डे पडलेले आहेत. शासनाच्या क्रीडा धोरणानुसार स्वतंत्र खेळाचे मैदान आखण्याचे शासनाचे निर्देश असतानाही, या शाळेत कोणतेही मैदान आखण्यात आलेले नाही. उलट, मैदानात मोठमोठे दगड असलेला मुरूम टाकल्याने विद्यार्थी जखमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



शाळेतील स्वच्छतेकडे कोणतेही लक्ष नाही. लाखो रुपयांचे वेतन घेणाऱ्या शिक्षकांकडून शाळेच्या व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. याबाबत माजी जिल्हा परिषद सदस्य नितीन हटवार यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी ही स्थिती अत्यंत लाजिरवाणी आहे, असे सांगितले.विशेष म्हणजे, मागील १७ महिन्यांमध्ये जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यपालन अधिकारी मोहपात्रा यांनी दोन वेळा शाळेला भेट देऊन आवश्यक निधी मंजूर केला होता. मात्र, या निधीचा योग्य वापर न होता त्याचा दुरुपयोग झाल्याचा आरोप नितीन हटवार यांनी केला आहे.

वर्षभरापासून शाळेत सोलर पॉवरचे काम प्रलंबित आहे, विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने घटत आहे, याला मुख्याध्यापकांचे दुर्लक्ष जबाबदार असल्याचा आरोप पालकवर्गातून होत आहे.शाळेच्या देखभाल व दुरुस्ती अंतर्गत बांधकाम विभागामार्फत प्राप्त झालेल्या तीन लाख रुपयांपैकी वर्गखोल्यांची दुरुस्ती न करता, प्राचार्यांनी संपूर्ण निधी मैदानात मुरूम टाकण्यासाठी वापरल्याचे समोर आले आहे. त्यात मोठे दगड असल्याने खेळण्याऐवजी तो परिसर अपघातासाठी कारणीभूत ठरत आहे.

### सव्वा तीन लाखांचा निधी, पण वर्गखोल्या अजूनही धोकादायक

शाळेच्या दुरुस्तीसाठी बांधकाम विभागाने तीन लाखांचा निधी मंजूर केला, परंतु वर्गखोल्यांमध्ये काहीही सुधारणा न करता प्राचार्यांनी संपूर्ण निधी मैदानात मुरूम टाकण्यासाठी वापरला. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेवर कुठल्याही प्रकारचा विचार केला गेला नाही. हा निधी नेमका कुठे गेला, हे तपासण्याची मागणी माजी जि. प. सदस्य नितीन हटवार यांनी केली आहे.

# मेळघाटातील १६ गावांत सीईओंचा ॲक्शन प्लान

## अति जोखिमीतील गरोदर महिलांना इरतत्र हलविले, अधिकारी, कर्मचाऱ्यांना मुख्यालय न सोडण्याचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक अमरावती, दि. १:** पूर व अतिवृष्टीमुळे संपर्क तुटणाऱ्या मेळघाटातील १६ गावांकरिता सीईओ संजिता महापात्र ॲक्शनमोडवर आहेत. तेथे सुविधांची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. या गावातील अतिजोखीम असलेल्या गरोधर महिलांना इतर ठिकाणी हलविण्यात आले आहे. तसेच स्थानिक अधिकारी, कर्मचाऱ्यांना मुख्यालय न सोडण्याचे आदेश देण्यात आले आहे.

जिल्ह्यात दरवर्षी मेळघाटातील चोपन, कोकमार, तांगडा, परसोली, किन्नीखेडा, कुंड, ढोकडा, माढिझडप, बिच्चूखेडा, बोधु, बोराट्याखेडा, रक्षा, कूही, कुटिंडा व डोमी या १६ गावांचा संपर्क पावसाळ्सात तुटतो. त्यामुळे सीईओंच्या आदेशावरुन या गावांमध्ये तीन महिन्याची आरोग्याची किट तयार करून तेथील अधिकारी, कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहण्याचे नियोजन केले आहे. याची अंमलबजावणी सुरू करण्यात आली असून पथक देखील सक्रिय करण्यात आल्याची माहिती सीईओ



संजिता महापात्र यांनी दिली. येथील अधिकारी, कर्मचारी मुख्यालय सोडणार नसून या गावातील अति जोखमीचे रुग्ण आणि गरोदर माता यांना इतरत्र हलविण्यात आले आहेत. तसेच या गावाला जोडणारे पुल उंच करण्याकरिता शासनस्तरावर पाठपुरावा सुरू असल्याचे सीईओंनी सांगितले. याशिवाय पावसाळा लक्षात घेता, शिकस्त शाळाची दुरुस्तीला प्रधान्य दिल्या जात आहे. तसेच ज्या शाळांमध्ये विद्यार्थीनींची अधिक संख्या आहे, त्या शाळांमध्ये प्राधाण्यांने सीसीटीव्ही लावण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे सीईओ म्हणाल्या.

एकाच कामाचे दोनदा वाटप जिल्हा परिषदेव्दारे ग्रामपंचायतींना कामे दिली जाते. परंतु ग्रामपंचायतींकडे बांधकामाची यंत्रना नसल्याने त्या कामांची पुन्हा त्यांच्यास्तरावर निविदा काढली जाते. एकच काम दोनदा वाटल्या जात असल्याने सीईओ संजिता महापात्र यांनी खंत व्यक्त केली. ही पध्दत बदलायला हवी, थेट येथूनच कामाची पध्दत सुरू करण्याबाबत सीईओंनी मत व्यक्त केले.

# तहेरीम फातेमाची डीसीपी सागर पाटील यांच्याकडे मागणी

## एएसआय कलाम यांच्या हत्येचा तपास सीआयडीकडे सोपवा

## दोषींना कठोर शिक्षा होण्यासाठी केस फास्ट ट्रॅक कोर्टात चालवा

विदर्भ प्रजासत्ताक

दि.१अमरावती :

जमीलकॉलनी येथील रहिवासी वपोलीसविभागात ३४वर्षे सेवा केलेले ए.एस. आय. अब्दुल कलाम अब्दुल कदीर यांची भरदिवसा निघृणहत्या करण्यात आली. याप्रकरणातत्यांची मुलगी तहेरीम फातेमा यांनी पोलीस आयुक्तांना निवेदन देऊनहत्येचा तपास सीआयडीकडे सोपवण्याची आणि हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्याची मागणी केली आहे.

तहेरीम फातेमा यांच्या निवेदनानुसार, त्यांचे वडील एएसआय अ. कलाम हे अत्यंत प्रामाणिक व निष्ठावंत अधिकारी होते. त्यांनी आपल्या कुटुंबासाठी कठोर परिश्रम घेतले व आपल्या दोन्ही मुलींना उच्च शिक्षण दिले. परंतु, पूर्वनियोजित कटात त्यांच्या वडिलांची हत्या करण्यात आली. आरोपींनी त्यांचा नेहमीचा मार्ग आधीपासून ठरवून ठेवून रेकी करून हा कट रचला. तहेरीम फातेमा यांनी स्पष्टपणे म्हटले आहे की, एक आरोपी अटकेत आहे, परंतु इतर गुन्हेगार अजूनही मोकाट आहेत, ज्यामुळे त्यांच्यासह संपूर्ण कुटुंबाला जीवाला धोका निर्माण झाला आहे.

एएसआय अ. कलाम यांच्या हत्येचा तपास सीआयडीकडे सोपवावा, जेणेकरून सखोल व निष्पक्ष चौकशी होईल. हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावा, जेणेकरून न्याय लवकर मिळेल. सर्व आरोपींना तत्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी. त्यांच्या व त्यांच्या कुटुंबाच्या सुरक्षिततेची खात्री द्यावी. पोलीस प्रशासन व कायद्यावर पूर्णविश्वास आहे आणि



पोलीस आयुक्त या प्रकरणात मानवी दृष्टिकोनातून निर्णय घेऊन न्याय मिळवून देतील, अशी अपेक्षा तहेरीम फातेमा हिने सीपींसमोर व्यक्त केली. दरम्यान, ही घटना आता शहरात चचेर्चा विषय बनली आहे आणि सर्वसामान्य नागरिक देखील या अमानुष हत्येतील सर्व गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी सुध्दा तिने केली आहे.

डीसीपी सागर पाटील निवेदन देतेवेळी अ. समद, तेहरीम फातेमा अ. कलाम, सम्म रिजवान, शेख इसरार आलम, मेराज खाँ पठान, नजीर खाँ, शाहीद नवाल, अटीकडर रहमान, महेबुल खान, नावेद इकबाल, सैय्यद मुजाहीद, शोएब कुरैशी, मो. अबरार, जावेदभाई, अन्सारभाई, मोहसीन, फहीम खान, अ. सोहेल, अ. शाहीद, अ.मतीन, मो. अनिक, सुफियान खान, अ.बिलाल हे उपस्थित होते.

# आता आठवड्यातून दोनच दिवस मुंबई फ्लाईट !'अलायन्स एअर'ची तयारी सुरु

## अमरावतीकरांना फसवणूक झाल्याचा अनुभव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि १ अमरावती**




अलायन्स एअरची अमरावती-मुंबई-अमरावती ही विमानसेवा, जी पूर्वी आठवड्यातून तीन वेळा होती. ती आता आठवड्यातूनफक्त दोनदिवसचचालणार आहे. अद्याप याबाबत अधिकृत घोषणा झालेली नाही, परंतु सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अलायन्स एअरने या संदर्भात आपली तयारी सुरु केली असून लवकरच घोषणा केली जाईल. या बातमीमुळे अमरावतीकरांना आपली फसवणूक झाल्यासारखे वाटत आहे.

उल्लेखनीय असे की, अमरावती-मुंबई-अमरावती विमानसेवा, मोठ्या जडमनाने सुरु करण्यात आली होती. सुरुवातीपासूनच बंद पडण्याचा धोका होता. प्रथम, पहिल्यादिवसापासूनच वेळेबद्दल प्रश्न उपस्थित केले जात होते. अमरावतीच्या लोकांसह उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही फ्लाईटच्या वेळेबद्दल चिता व्यक्त केली होती. नवी मुंबई विमानतळ सुरू झाल्यानंतर वेळेत बदल केला जाईल असे आश्वासन देण्यात आले होते.

यानंतर, विमानात पेट्रोल भरण्यासाठी वापरण्यात आलेला टँकर चिखलातअडकल्याने उड्डाण रद्द करण्यात आले. तसेच, या मार्गावरून उड्डाण करणाऱ्या विमानांबद्दल सोशल मीडियासह प्रत्येक प्लॅटफॉर्मवर चिता व्यक्त केली जात होती. अहमदाबादमध्ये एअर इंडियाच्या विमान अपघातानंतर, विमानाबद्दल अनेक शंका उपस्थित केल्या जात होत्या. त्याच वेळी, विमानात जागा रिकाम्या असूनही जास्त भाडे आकारण्याचा मुद्दा देखील हे विमान बंद करण्याचे संकेत सूचित करत होता.

अमरावती-मुंबई दरम्यान सोमवार, बुधवारआणि शुक्रवार असे आठवड्यातून तीन दिवस चालणारी विमानसेवा आता आठवड्यातून फक्त दोनदिवसचउड्डाणकरेल. यामुळे अमरावतीतील लोकांना फसवणूक झाल्यासारखे वाटत आहे.अमरावती-मुंबई भाडे २४९९रुपये निश्चित केले गेले असले तरी ते कधीही ८००० रुपयांपेक्षा कमी झाले नाही. उड्डाणाची वेळ फायदेशीर नसली तरी, लोक या विमानाने प्रवास करण्यास प्राधान्य देत आहेत. असे असूनही, अलायन्स एअरने उड्डाणांची संख्या कमी करणे म्हणजे विमानकंपनीने अमरावतीच्या नागरिकांशी केलेला विश्वासघात आहे. या मार्गावरील उड्डाणांची संख्या कमी करण्याऐवजी, जर त्याचे वेळापत्रक सुधारले तर ते लोकांसाठी आणि अलायन्स एअरसाठी फायदेशीर ठरेल, अशी लोकांची मागणी आहे.

# वन्य प्राण्यांमुळे नांदगाव तालुक्यातील शेतकरी त्रस्त

## तूर पिकांचे मोठे नुकसान; शेतकऱ्यांकडून वनविभागाकडे भरपाईची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१नांदगाव खंडेश्वर**

नांदगाव खंडेश्वर तालुक्यात सध्या खरीप हंगामाची पेरणी जवळपास पूर्ण झाली आहे. शेतकऱ्यांनी तूर, सोयाबीन, भुईमूग अशा पारंपरिक पिकांची पेरणी केली आहे. मात्र, पेरणीनंतर जंगली वराहच्या वाढत्या उपद्रवामुळे शेतकरी अक्षरशः त्रस्त झाले आहेत. विशेषतः तूर पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. अनेक शेतकऱ्यांना एकाच पिकाची दोन वेळा पेरणी करावी लागत आहे.



जंगली वराहांनी तुर पाडण्याचा अक्षरशः कार्यक्रम' लावला असून दिवसेंदिवस त्यांचा त्रास वाढतो आहे. याबाबत वनविभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना देऊनही कोणताही अधिकारी तालुक्यात फिरकायला तयार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. रात्री अपरात्री शेतकऱ्यांना शेतात जाऊन तुरीचे रक्षण करावे लागत असल्याचे स्थानिक शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. काही शेतकरी आपले जीव धोक्यात घालून शेतात रात्री जागून पहारा देत आहेत. या वराहांची संख्या जास्त असल्याने शेतकऱ्यांना एकटे शेतात जायला देखील भीती वाटत आहेत. वराह हल्ल्यामुळे शेतकरी जखमी होण्याचाही धोका निर्माण झाला आहे.

पिकांचे रक्षण करण्यासाठी काही शेतकऱ्यांनी शेताच्या आजूबाजूला लोखंडी तार लावून त्याला बॅटरीचा करंट जोडला आहे. तरीही वराह शेतात शिरुन तूर पाडत आहेत. परिणामी शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान दिवसेंदिवस वाढत आहे.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी वनविभागाकडे नुकसानग्रस्त शेतांची पाहणी करून पंचनामे करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. तसेच जंगली प्राण्यांनी नुकसान केलेल्या पिकांची नुकसानभरपाई शेतकऱ्यांना मिळावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. वनविभागाने याकडे तात्काळ लक्ष देऊन उपाययोजना कराव्यात, अन्यथा शेतकरी आक्रमक आंदोलनाचा इशाराही परिसरातील शेतकऱ्यांनी दिला आहे.

**नुकसान भरपाई द्यावी**

वन्य प्राण्याच्या हौदोसामुळे शेतकरी त्रस्त झाला आहे. शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या शेतपिकांची नुकसान भरपाई द्यावी.

**– विजय चव्हाण, शेतकरी.**

# रस्त्यावर मोकाट गुरांचा उपद्रव:कचराकुंडीमुळे समस्या वाढली; लहान मुले अन् वृद्धांवर हल्ला होण्याची शक्यता



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

शहरात रस्त्यावर फिरणाऱ्या मोकाट जनावरांच्या कळपांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. यामुळे अपघाताची शक्यताही वाढली आहे. वाहचालकांचे जिव धोक्यात आले आहेत. मोकाट जनावरे पकडण्याची मोहीम महापालिकेकडून राबवली जात नसल्याने या जनावरांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. रस्त्यांवरील या जनावरांमुळे सामान्य नागरिक मात्र त्रस्त झाला आहे.

मागील अनेक दिवसांपासून पाळीव मोकाट जनावरांचा वावर वाढला आहे. यामुळे किरकोळ अपघात घडले आहेत. जनावरांनी काही नागरिकांवर हल्ला केला असून दुचाकीस्वारांचेही अपघात घडले आहेत. त्यामुळे या मोकाट जनावरांचा वेळीच बंदोबस्त करावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांतून होत आहे. अमरावती, नागपूर, बडनेरा - अकोला, अशा महामार्गासह काँग्रेसनगर, नवसारी, एमआयडीसी रोड, वडाळी, विद्यापीठ, शेगावनाका अशा मध्यवर्ती तसेच शहरातील रस्त्यांवर ठिकठिकाणी जनावरांचे साम्राज्य असल्यामुळे वाहनचालकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. रुख्मिणीनगर ते काँग्रेसनगर या रस्त्यावर तर कायम मोकाट जनावरे दिसतात. या रस्त्यावर एक महाविद्यालय, शाळा आहेत. त्यामुळे या रस्त्यावर सातत्याने वर्दळ असते; मात्र, या रस्त्यावर मोकाट जनावरे फिरत असल्यामुळे येथे अनेकदा किरकोळ अपघात घडले आहेत.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा ८६०५९४८८५३

# वरूड परिसरात सेंद्रिय शेती प्रकल्पाचे उद्घाटन : महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय वरुडच्या सहकार्याने कार्यक्रम आयोजित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१वरुड**

जरुड येथील प्रगतिशील शेतकरी शेषराव खाडे यांचे इसंब्री शिवारातील शेतात डॉ. कृष्ण चंद्र सेंद्रिय निविष्ठा प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. अमरावती येथील शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष केशव मेटकर यांच्या मार्गदर्शनात व महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय वरुडच्या सहकार्याने हा कार्यक्रम आयोजित केला होता.



या वेळी प्राचार्य डॉ. दिलीप हांडे, शेषराव खाडे, वृषाली वानखडे, किशोर भोंड, डॉ. संजय सातपुते, डॉ. मंगेश बोबडे, डॉ. शुभम साखरे, शेतकरी उपस्थित होते.

भारत हा कृषिप्रधान देश असला तरी सामान्य शेतकरी अजूनही आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. सततच्या खते व कीटकनाशकांवरील खर्चामुळे शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. शिवाय खते व कीटकनाशके वापरल्यामुळे शेतजमीन नापीक झाली आहे. नापिकी व कर्जामुळे शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त होत आहेत. या अडचणींमधून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी व शेतजमिनीचा पोत सुधारण्याकरिता वरुड तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यापर्यंत पोहोचून डॉ. कृष्ण चंद्र सेंद्रिय निविष्ठा प्रकल्प कार्यान्वित करण्याचा महाविद्यालयाचा मानस आहे. या प्रकारचे प्रकल्प कार्यान्वित झाल्यास शेतजमिनीचा पोत सुधारून शेती जास्त पिकेल. तसेच शेतकऱ्यांचा खते व कीटकनाशकावरील खर्च कमी होऊन आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होईल. सेंद्रिय शेतीतील भाजीपाला व धान्य आरोग्यास हितकारक राहील.

या प्रकल्पाच्या माध्यमातून महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना माहिती व प्रशिक्षण देण्यात येणार असून, ज्या विद्यार्थ्यांकडे शेतजमीन आहे अशा विद्यार्थ्यांना हा प्रकल्प त्यांच्या शेतात कार्यान्वित करण्यास प्रेरित करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकरी या प्रकल्पाशी जोडण्याचा मानस प्राचार्य डॉ. दिलीप हांडे यांनी व्यक्त केला. तसेच या प्रकल्पाला लागणारा खर्च अतिशय कमी असल्यामुळे सर्वसाधारण शेतकऱ्यांना परवडणारा आहे.

# जूनमध्ये अपेक्षेपेक्षा कमी पाऊस:अमरावतीत सरासरीपेक्षा ३९ मिमी कमी नोंद, १४ पैकी ११ तालुक्यांत पावसाची उणीव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१अमरावती**

या वर्षीचा मान्सून वेळेवर आणि पुरेसा असेल असे एप्रिल-मे मध्ये केलेले भाकीत काहीसे फोल ठरले आजूनमध्ये अपेक्षेपेक्षा कमी पाऊस:अमरावतीत सरासरीपेक्षा ३९ मिमी कमी नोंद, १४ पैकी ११ तालुक्यांत पावसाची उणीवहे. जून महिना पूर्ण संपला तरी अमरावती जिल्ह्यात पाऊस पुरेसा झाला नाही. दरवर्षी या महिन्यात १४५.७ मिलीमीटर पाऊस पडतो. परंतु यावर्षी तो १०६.४



मिलीमीटरच्या पुढे गेला नाही. त्यामुळे ३९.३ मिलीमीटर कमी अशी नोंद झाली आहे. पाऊस पुरेसा न झाल्यामुळे धरणांचे जलसाठेही सरासरीपेक्षा कमीच आहे. दरम्यान पेरणी केलेल्या शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागेल का, याची भीती सतावत असून छत्री, रेनकोट आदी साहित्य विक्रीच्या तेजीनेही अद्याप वेग घेतला नाही. जिल्ह्यातील १४ पैकी केवळ तीन तालुक्यांनी जूनमध्ये सरासरी गाठली. इतर ११ तालुके माघारले आहेत.

महसूल दप्तरी असलेल्या नोंदीनुसार गेल्या पाच वर्षाची जून महिन्याची सरासरी ही १४५.७ मिलीमीटर एवढी आहे. तीच सरासरी या वर्षीही गाठली जाईल, असा अंदाज होता. परंतु जून महिन्याचे पहिले दोन आठवडे बऱ्यापैकी निरंक राहिल्याने हा महिना सरासरीपासून मागे लोटला गेला. ताज्या आकडेवारीनुसार आज, सोमवार, ३० जूनपर्यंत जिल्ह्यात १०६.४ मिलीमीटर एवढाच पाऊस पडला. वरुड, अंजनगाव सुर्जी आणि चांदूर बाजार हे तीन तालुके वगळता उर्वरित ११ तालुक्यांमध्ये मान्सून बराच मागे आहे.

# इतवारा - नागपुरी गेट उड्डाणपुला संदर्भात डॉ.सुनील देशमुख यांची हायकोर्टात याचिका : प्रधान सचिव,कार्यकारी अभियंता व कंत्राकदार यांना नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

वाहतूक कोंडीमुळे त्रास अमरावती शहरातील अत्यंतिक वर्दळीचा मार्ग असलेल्या चित्रा-चौकइतवारा बाजार - नागपूरी गेट उड्डाणपुलाचे बांधकाम सुरू होऊन तब्बल सात वर्षे उलटून सुद्धा अद्यापही पूर्णत्वास गेलेला नाही. या रखडलेल्या उड्डाणपुलामुळे किमान लाखभर नागरिकांना वाहतूक कोंडीमुळे त्रास होत आहे.राज्य शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग व कंत्राटदार यांनी अवलंबलेल्या अत्यंतिक दिरंगाईव अनास्थेबद्दल माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये उड्डाणपुलाचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्याच्या मागणीला घेऊन जनहितयाचिका झखड/४७/२०२५ अन्वये दाखल केली आहे. या मध्ये महाराष्ट्र शासन, प्रधान सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती व कंत्राटदार मे. चाफेकर ॲण्ड कंपनी यांना प्रतिवादी केले होते.उच्च न्यायालयाचे नायमूर्ती नितीन सांबरे व न्यायमूर्ती सचिन देशमुख यांच्या द्वि सदस्य खंडपीठाने सरकारी अधिवक्तांना निर्देश देऊन उपरोक्त तीनही प्रतिवादी सात दिवसाचे आत कधीपर्यंत उड्डाणपूल पूर्ण करणार याबद्दल नोटिसेस जारी करून त्याचा रोड मॅप न्यायालयासमक्ष सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.




संविधानातील कलम २१ अनुसार नागरिकांना बहाल केलेल्या न चांगल्या मूलभूत सुविधा निर्धोकपणे वापरण्याच्या संवैधानिक अधिकाराचे हनन, या अव्याहत बांधकामामुळे हवा प्रदूषण वध्वनी प्रदूषणामुळे नागरिकांच्या स्वास्थ्यावर होणारे परिणाम, ट्रॅफिक जॅम मुळे नागरिकांना होणारा मनस्ताप, त्याचप्रमाणेप्रकल्प पूर्ण होण्याच्या दिरंगाई मुळे याप्रकल्पाच्या वाढलेल्याकिमतीपोटीहोणाऱ्या वाढीव शासन निधीचा अपव्यय याला लगाम घालून संबंधिताना योग्य ताकीद देऊन न्यायालयाने कारवाईचा बडगा उगारून उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी निधीची उपलब्धता व टाईम बउंड कार्यक्रम सादर करण्याबाबत राज्य शासनाला निर्देशित करण्यात यावे अशी मागणी या जनहित याचिकेत डॉ. सुनील देशमुख यांनी न्यायालयाला केली होती.या जनहित याचिकेच्या रेट्यामुळे आता तरी या उड्डाणपुलाचे काम मार्गी लागेल असे आशादायी चित्र निर्माण झालेले आहे. ही जनहित याचिका डॉ. सुनील देशमुख यांनी अमरावती शहरातील प्रथितयश उच्च न्यायालयाचे अधिवक्ता शाहू चिखले यांच्या माध्यमातून दाखल केलेली असून त्यांनी अमरावती शहराच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या विषयात यशस्वी युक्तिवाद केला. वर्ष २०१८ मध्ये डॉ. सुनील देशमुख यांचे अथक प्रयत्नानेवतत्कालीन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री श्री. नितीनजी गडकरी यांचे सहकार्याने या उड्डाणपुलाचे कार्य केंद्रीय रस्ते निधी अंतर्गत मंजूर करून त्याचे भूमिपूजन करून कामाला सुरवात करण्यात आलेले होती.

# आज मध्यरात्रीपासून वाहतूकदार संपावर जाणार

## राज्यभरातील स्कूल बस मालकांचाही सहभाग संपाने शाळेत जाणाऱ्या मुलांचे हाल होण्याची शक्यता

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१अमरावती

मंगळवारी मध्यरात्रीपासून महाराष्ट्र राज्य ट्रक टेम्पो टँकर्स बस वाहतूक संघाच्या नेतृत्वाखाली सर्व वाहतूकदारांनी मध्यरात्रीपासून चक्काजाम आंदोलन छेडले असतानाच राज्यभरातील स्कूल बस मालकांनी बुधवारी २ जुलैपासून अनिश्चित काळासाठी संपावर जाण्याची घोषणा केली आहे.




स्कूल बस संपाने, शाळेत जाणार्या मुलांचे हाल होण्याची शक्यता आहे. वाहतूक पोलिसांकडून बसचालकांवर होणारी अकारण कारवाई, सीसीटीव्ही, वेबरेडर व जीपीएस यांसारख्या सुविधांसाठी ई-चालानद्वारे होणारी दंडात्मक कारवाई, तसेच परवानग्यांसाठी होणारी अडवणूक या विरोधात शाळा बस ओनर्स असोसिएशनने या संपाची हाक दिली आहे.

स्कूल बसप्रमाणेच माल वाहतूकदारांचाही मंगळवारी मध्यरात्रीपासून सुरू होणारा संप हा खासकरून परिवहन विभाग आणि पोलिसांकडून होणारी पिळवणूक, अडवणूक विरोधात आहे. वाहतूकदारांकडून वसूल करण्यात येणारा ऑनलाईन दंड , दंडाची रक्कम कमी करणे, थकीत दंड माफ करणे, क्लिनरची सक्ती रद्द करणे, व्यावसायिक वाहनांची प्रवेश वेळेचा पुनर्विचार करणे, वाहनतळाची व्यवस्था करणे या सहा प्रमुख मागण्यांसह प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य ट्रक टेम्पो टँकर्स बस वाहतूक संघाच्या नेतृत्वाखाली १ जुलैच्या मध्यरात्रीपासून चक्का जाम आंदोलन पुकारले आहे.

वारंवार सरकारकडे तक्रारही केल्या आहेत. मात्र चालकांचा त्रास काही कमी झाला नाही. याविरोधात आझाद मैदानात बेमुदत उपोषणही करण्यात आले. मात्र याचीही दखल सरकारने घेतली नाही. त्यामुळे १ जुलैच्या मध्यरात्रीपासून राज्यभरात चक्का जाम आंदोलन पुकारले आहे. हा निर्णय सर्व वाहतूक संघटनांनी घेतला असून राज्यभरातील सर्व वाहतूकदार सहभागी होणार असल्याचे महासंघाचे अध्यक्ष प्रकाश गवळी यांनी सांगितले.

सर्व शैक्षणिक संस्थांनी तात्पुरते ऑनलाईन वर्ग घेण्याचा विचार करावा किंवा वेळापत्रकात बदल करावा. संप मिटेपर्यंत पालकांनी मुलांसाठी पर्यायी वाहतूक व्यवस्था करावी, असे स्कूल बस मालक संघटनेचे अध्यक्ष अनिल गर्ग यांनी म्हटले आहे.

# अरुणभाऊ अडसड यांच्यामुळे विदर्भात कमळ फुलण्यास सुरुवात झाली : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी दिल्या शुभेच्छा...दिव्यांगाना तीन चाकी सायकलचे वितरण

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१धामणगाव रेल्वे

विपरीत परिस्थिती आणीबाणीचा काळात मागील सात दशक संघर्ष करून विदर्भात अरुणभाऊ अडसड यांनी शिस्तबद्ध कार्यकर्ते घडविले त्यांच्यामुळे आज भाजपला चांगले दिवस आले असून त्यांच्या पराकाष्टेने त्याकाळी विदर्भात कमळ फुलण्यास सुरूवात झाली असल्याचा संदेश देत दीर्घायुष्याच्या शुभेच्छा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

विदर्भाची बुलंद आवाज भाजपाचे ज्येष्ठ नेते माजी आमदार अरुणभाऊ अडसड यांचा वाढदिवस तिन्ही तालुक्यात विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला मंगरूळ दस्तगीर येथे महाआरती, चांदूर रेल्वे येथे रक्तदान शिबिर, भाजपाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा गौरव करण्यात आला धामणगाव रेल्वे येथील अरूनोदय निवासस्थानी अरुणभाऊ अडसड व त्यांच्या अर्धांगिनी प्रतिभाताई अडसड यांना भाजपा महिला आघाडीच्या वतीने प्रथम औक्षवंत करण्यात आले





त्यानंतर दिवसभर राज्यातील भाजपचे ज्येष्ठ नेते व कार्यकर्त्यांनी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी एकच रीघ लावली होती जिल्ह्यातील विविध सामाजिक संघटना सरपंच, उपसरपंच, विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांनी प्रशासकीय विभागातील अधिकारी कर्मचारी यांनी एकच गर्दी केली होती

**केंद्रातील मंत्र्यांसह मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्या शुभेच्छा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सचिव, गृहमंत्री अमित शहा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, भाजपाचे नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या सह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह मंत्रिमंडळाच्या सर्वच मंत्र्यांनी व राज्यातील आमदारांनी त्यांना शुभेच्छा दिल्या

**दिव्यांगाना तीन चाकी सायकलचे वितरण**

तालुक्यातील दिव्यांगांना गौण खनिज अंतर्गत प्राप्त निधीतून तीन चाकी सायकलचे वितरण विदर्भ वैधानिक विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष अरुणभाऊ अडसड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार प्रताप अडसड, तहसीलदार अभय घोरपडे प स चे गटविकास अधिकारी योगेश वानखडे, विस्तार अधिकारी निलेश वाघ तसेच भाजपा पदाधिकाऱ्याची उपस्थिती होती.

# आषाढीनिमित्त पंढरपूरसाठी विशेष रेल्वेगाड्या; नवी अमरावती, खामगाव, अकोल्याहूनही रेल्वे

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१अमरावती

पंढरीच्या विठ्ठलदर्शनाची आस लागलेल्या भाविकांसाठी चार रेल्वे स्थानकांवरून विशेष रेल्वेगाड्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे विदर्भातील विठ्ठल भक्तांची सोय होणार आहे. ६ जुलै रोजी आषाढी एकादशी आहे. यासाठी अनेक भाविक पंढरीच्या पांडुरंगाच्या दर्शनासाठी जाण्याच्या तयारीत आहेत. भाविकांच्या सोयीसाठी विशेष रेल्वेगाड्या धावणार आहेत. आषाढीसाठी विदर्भातून नागपूर, नवी अमरावती, अकोला आणि खामगाव येथून या रेल्वेगाड्या सुटणार आहेत.

नागपूर-मिरज ही गाडी ४ आणि ५ जुलै रोजी सकाळी ८ वाजून ५० मिनिटांनी पंढरपूर, मिरजेच्या दिशेने सुटेल. दुसऱ्या दिवशी सकाळी पंढरपुरात, तर मिरजेत दुपारी १२ वाजता पोहचेल. यानंतर मिरजेतून दुपारी १ वाजता सुटून दुसऱ्या दिवशी दुपारी १२ वाजून २५ मिनिटांनी नागपूरला पोहोचेल. ही गाडी सर्व प्रमुख स्थानकांवर थांबेल. अकोला ते मिरज दरम्यान यात्रेकरूंच्या सोयीसाठी रेल्वेकडून आषाढी विशेष गाडी चालविण्यात येणार आहे. येत्या ५ जुलै रोजी ०७५०५ क्रमांकाची गाडी सकाळी ११ वाजता अकोला रेल्वे स्थानकावरून सुटेल. दुसऱ्या दिवशी सकाळी ८.१५ वाजता पंढरपूर आणि ११ वाजता मिरजेत पोहचेल. यानंतर ६ जुलैला ०७५०६ क्रमांकाची गाडी दुपारी २.१५ वाजता मिरज आणि ४.२० वाजता पंढरपूरहून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी ४ वाजून ५० मिनिटांनी अकोला येथे पोहचेल. वाशिम, पूर्णा, लातूर मार्गे ही गाडी धावणार आहे.



खामगाव ते पंढरपूर दरम्यान देखील विशेष गाडी धावणार आहे. ३ आणि ७ जुलै रोजी ०११२१ क्रमांकाची गाडी सकाळी ११.३० वाजता खामगाव रेल्वे स्थानकावरून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी पहाटे ३.३० वाजता पंढरपूर येथे पोहचेल. सोबतच ४ आणि ७ जुलै रोजी ०११२२ क्रमांकाची गाडी पंढरपूरहून पहाटे ५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी सायंकाळी ७ वाजून ३० मिनिटांनी खामगाव येथे पोहोचणार आहे.

नवी अमरावती-पंढरपूर विशेष रेल्वेगाडी क्रमांक ०१११९ नवी अमरावती येथून २ जुलै आणि ५ जुलै रोजी दुपारी २.४० वाजता सुटेल आणि पंढरपूर येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ९.१० वाजता पोहोचेल. विशेष रेल्वेगाडी क्रमांक ०११२० पंढरपूर येथून ३ जुलै व ६ जुलै रोजी पंढरपूर येथून सायंकाळी ७.३० वाजता सुटेल आणि नवी अमरावती येथे दुसऱ्या दिवशी १२.५० वाजता पोहोचेल. बडनेरा, अकोला, शेगाव, भुसावळ, चाळीसगाव, कुर्डवाडी मार्गे ही गाडी धावणार आहे.

# विद्युत केबल, पंप मोटर चोरी प्रकरणात दोघे जेरबंद, १.५३ लाखांचा मुद्देमाल जप्त




विदर्भ प्रजासत्ताक
दि.१मोर्शी

मोर्शी पोलीस स्टेशन हद्दीत गेल्या काही दिवसांत विविध शेतकऱ्यांच्या विहिरीवरून तसेच विद्युत खांबांवरील तारांची चोरी करणाऱ्या टोळीचा छडा लावत स्थानिक पोलिसांनी दोन चोरट्यांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून एकूण १.५३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, तीन गुन्हे उघडकीस आले आहेत.

फिर्यादी विक्रमादित्य तडस, मनोहर भोरे व श्रेयश काळे यांनी शेतातील विद्युत केबल, पंप मोटर व तारांचे चोरीसंबंधी पोलिसांत तक्रार दिली होती. पोलीस निरीक्षक सुरज बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने तपास करत हरिदास घोडगाव (रा. नशिरपूर) व मनोज मडावी (रा. नशिरपूर) यांना अटक केली.सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत व उपविभागीय अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहेत.

जप्त मुद्देमालामध्ये ओरिएंट कंपनीची ५ एचपी पंप मोटर (१०,०००/-)१२५० मीटर ॲल्युमिनियम विद्युत तार (४०,०००/-), ३० फुट निळ्या रंगाचा केबल (२,०००/-), चोरीत वापरलेली डिस्कव्हर मोटरसायकल (३०,०००/-), काटोल पोलीस स्टेशनमधील गुन्ह्यातील चोरीची पल्सर गाडी (७०,०००/-)

# सुधारित पीक विमा योजनेसंदर्भात सर्वंकष चर्चेसाठी बैठक लावावी - आ.संजय खोडके

## लोक प्रतिनिधीच्या मार्फत समिती स्थापन करून बैठक घेण्याबाबत कृषीमंत्रीनी दिली कबुली

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१अमरावती

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानपरिषदेतील कामकाजादरम्यान प्रशोत्तराच्या तासांमध्ये सुधारित पीक विमा योजने संदर्भात चर्चा करतांना आ.संजय खोडके यांनी पीक विमा योजनेचे पूर्वीचे चार ट्रिगर बंद करून एकच ट्रिगर सुरु असल्याने पुढील काळात नवा पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे यासंदर्भात लोकप्रतिनिधीच्या मार्फत एक समिती व सर्वंकष चर्चा करण्यासाठी बैठक लावावी, अशी



सुचना सभागृहाला केली. यावेळी प्रश्नावर उत्तर देतांना कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी पीक कापणी प्रक्रिया आधारित पीक विमा योजना हि राज्य शासनाने सुरु केली असल्याने या सभासदांना याबाबत शंका व संशय असेल त्या दृष्टीने सुधारणा करण्यासंदर्भात बैठक घेण्याचे मान्य केले आहे.

राज्य विधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात प्रश्न क्रमांक - २ वर चर्चा करतांना आ.संजय खोडके यांनी सभागृहाला अवगत केले की, शासनाने हि सुधारित पीक विमा योजना लागू केली आहे.म्हणजेच नवीन पीक कापणी प्रयोग आधारित पीक पिमा योजना यातून पूर्वीचे तीन ट्रिगर बंद केले आहे. पीक विमा योजनेत जे चार ट्रिगर होते ज्यामध्ये पेरणी नंतर पाऊस न पडल्यास शेतकऱ्यांना अग्रीम मिळत होती. नैसर्गिक आपत्ती जसे कि अतिवृष्टी, पूर, भूस्खलन, गारपीट, वादळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना भरपाई मिळत होती. अनियमित हवामान,तापमान, किंवा इतर प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास भरपाई दिली जात होती. पिकाची कापणी केल्यानंतर ती शेतातच भरून ठेवलेली असताना अतिवृष्टीमुळे किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास भरपाई मिळत होती. असे चार ट्रिगर होते. परंतु नवीन पीक विमा योजनेत वरील तीन ट्रिगर बंद करण्यात आले. शेवटचा चौथा काढणीपश्चात नुकसान भरपाई या आधारावरच पीक विमा योजना सुरु करण्यात आली आहे.





